महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित

# लोकनेते व्यंकटराव हिरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय पंचवटी नाशिक

**पुणे विद्यापीठ संलग्न क्र पी.यू./एन.एस/ए.एस.सी/१८(१९७१)**

(NAAC Reaccredited at '**A**' Level with CGPA 3.01)

Web site : www.lvhcollege.com * E-mail: lvhcollege@gmail.com



दिनांक ३१/०४/२०२२

## ग्रंथालय वार्षिक अहवाल २०२१-२२

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०७१-७२ साली सुरु झाले. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ हे महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. महाविद्यालयाची स्थापना महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे संवर्धक लोकनेते व्यंकटराव हिरे यांनी केली. लोकनेते व्यंकटराव हिरे यांनी सर्वच क्षेत्रात अत्यंत भरीव असे योगदान दिले. "बहुजन हिताय बहुजन सुखाय" हे ब्रीद घेऊन बहुजनांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कठीबद्ध असलेली नाशिक जिल्ह्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणजे महात्मा गांधी विद्यामंदिर होय. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक गरजा लक्षात घेऊन संस्कृती विषयक विचार कसे प्रगल्भ होतील याकडे विषेश लक्ष दिले जाते. सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने वर्ष भर विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते.

महात्मा गांधी विद्यामंदिर हे बहुभुजा , बहुनेत्र, बहुअंग, बहुचित्त असलेलं देवस्वरूप देवस्थान आहे , असे म्हटले तर वावगे ठरू नये इतकं अमाप उपकार येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर शिकवणाऱ्या शिक्षकांवर तसेच वेगवेगळ्या प्रकारे सेवा देणाऱ्या सर्वप्रकारच्या सेवकांवर केलेले आहेत ,, देवस्थान म्हणजे तरी काय असते तर जेथून जगण्याचा मार्ग, जीवनाचा आधार, मनाची शांती आणि चित्ताचे समाधान मिळते. महात्मा गांधी विद्यामंदिर हे सर्व देत आले आहे म्हणून त्याला देवस्थान म्हणण्यात संकोच वाटत नाही , मान्य हा भावातिरेक आहे पण एखाद्या पाषाणाच्या वास्तूतुन संवेदनांचे घुमारे फुटले तर कल्पनेला मुक्तछंदाने वाहू देण्यात , त्या वास्तूच्या जाणिवांचे, त्यातील अनुभवांचे उदात्तीकरण करण्यात जो अवीट गोडवा आहे तो अमृताहूनही गोड असतो ते एक जिवंतपणाचे लक्षण आहे असे मी मानतो,

हे विद्यामंदिर गरीब , श्रीमंत, जातविविधता, धर्मविविधता, या सर्वांना एका धाग्यात बांधून कोणताही भेदाभेद न करता आपल्या बहुभुजानी सर्वांवर मायेचा हात फिरवतं , बहुनेत्रांनी सर्वांवर कृपादृष्टी करतं , बहुअंगांनी सर्वांना सामावून घेतं , बहुचित्ताने सर्वांची काळजी करतं , त्यातल्या त्यात एल. व्ही. एच. या लोकनेत्यांच्या अस्थीरूपाने असलेल्या अदृश्य अस्तित्वाने पुण्यभूत झालेल्या दृश्य वास्तु त्यांच्या कार्याची, कर्तृत्वाची लोकसेवेची सतत जाणीव करून देते, व प्रेरणा देत असते.

जगातील ज्ञानामध्ये दरवर्षी भर पडत आहे. त्यामुळे ग्रंथ , ज्ञान व साहित्य साधने मोठ्या संख्येने प्रसिद्ध होत आहेत. ग्रंथालयातील वाचक वर्गाचे समाधान होण्यासाठी आपण तशा प्रकारच्या ग्रंथालयातून सेवा दिल्या जातात. गेल्या वीस वर्षात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने झेप घतेली आहे. या क्षेत्रात लक्षणीय परिवर्तन झाले आहे. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे आहे. तंत्रज्ञानाचा झपाट्याने विकास होत आहे. सध्या सर्वत्र ग्रंथालयाचे व माहिती केंद्रे स्थानिक , प्रादेशिक आणि जागतिक पातळीवर स्थापन झाली आहेत. ती ज्ञान प्रसाराच्या क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. शास्त्रीय व इतर संशोधनाचा वेगाने विकास होत आहे.

ग्रंथालयाने वर्षभरात झालेल्या विविध उपक्रमांची कांही महत्त्वाच्या विषयाची वृत्तपत्रीय कात्रणे वाचकांना हाताळता यावी याकरिता व्यवस्थित फाईल करुन ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता ठेवण्यात आली आहेत. विद्यार्थी , संशोधक यांच्याकरिता अद्यावत माहितीकरिता नियतकालिकांची बांधणी करुन विविध विभागाला उपलब्ध करून संदर्भाकरिता ठेवली आहेत. ग्रंथालयात विविध इ. विषयांवरील पुस्तके , आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्ववकोष, गॅझीटीयर, ॲटलास, इअरबुक, डिक्शनरी, निरनिराळ्या विषयावरची ग्रंथ उपलब्ध आहेत. वेळोवेळी ग्रंथालयाला अनुसरुन नवीन पुस्तके खरेदी करण्यात येतात. ग्रंथालयीन नियमानुसार ग्रंथालयाची मांडणी केली आहे.

ग्रंथालयाचा वाचकाकरिता जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. तसेच पुस्तके शोधण्याकरिता संगणक प्रणाली कॅटलॉगच्या सहाय्याने वाचकांना मदत होते. विशेष ग्रंथालयीन नेटवर्क उदा. एन लिस्ट आणि डेलनेटच्या माध्यमातून ऑनलाईन ग्रंथालयीन सेवा दिली जाते.

विद्यार्थी हिताचा विचार करून महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग चैतन्यशील आणि तेजस्वी ठेवण्यासाठी महाविद्यालयातील सर्वच सदैव प्रयत्नशील असतात. कोरना प्रादुर्भावाच्या काळात आभासी ग्रंथालय सेवा देणे. जेणे करून विद्यार्थी वर्गाला व्हर्चुअल पोर्टल च्या माध्यमातून वाचन साहित्य घरी बसून लाभ घेता येईल अशा सेवा प्रदान कर ण्यात आल्या. आजमितीस स्थापनेपासून ते आज घडीला ग्रंथालयात खालील प्रमाणे ग्रंथसंख्या उपलब्द आहे. हा ज्ञानयज्ञ अतिशय महत्वाचा असून ग्रंथालय विभागाचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

**ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या वाचन साहित्याचा तपशिल.**

| अ.नं. | विवरण | मागील ग्रंथांची संख्या | चालू वर्षातील वाढ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | विकत घेतलेली ग्रंथ | | | |
| | १.वरिष्ठ विभाग | ४९४४९ | ३०० | ४९७४९ |
| | २. वरिष्ठ पी.बी.एफ. | ७२०३ | १३७२ | ८५७५ |
| | ३.कनिष्ठ विभाग | १४२८१ | ०९ | १४२९० |
| | ४. कनिष्ठ पी.बी.एफ.. | ४८५९ | ० | ० |
| | ५.व्यवसाय शिक्षण विभाग आणि इतर | १०७७३ | ० | ० |
| | ग्रंथसंख्या | ८६५६० | १६८१ | ८८२४१ |
| २ | प्रबंध व लघुप्रबंध | ०५ | - | |
| ३ | नियतकालिकांचे बांधीव खंड | ५५७ | - | |
| ४ | सीडी व डीव्हीडी | २४५ | - | |
| | एकूण | ८०७ | - | |
| ५ | रद्दबातल ग्रंथसंख्या<br>१. वरिष्ठ विभाग<br>२. वरिष्ठ पी.बी.एफ.<br>३. कनिष्ठ विभाग<br>४. कनिष्ठ पी.बी.एफ..<br>५. व्यवसाय शिक्षण विभाग आणि इतर | <br>४१६१<br>१४६८<br>३४९९<br>२८२४<br>०२ | <br>-<br>-<br>-<br>-<br>- | <br>४१६१<br>१४६८<br>३४९९<br>२८२४<br>०२ |
| ६ | इतर (बुक बँक/ गुणवत्ता विकास / कनिष्ठ एस. अे. एफ./ वरिष्ठ एस. अे. एफ./ एम. एस.डब्लू / के.बी.एच.इजिनि./ व्यवसाय शिक्षण मार्गदर्शन कोर्स ) | ६४५५ | -<br>- | ६४५५ |
| | एकूण | १८४०९ | - | १८४०९ |
| **ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या ग्रंथांची संख्या** | | ६९८३२ | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | नियतकालिके<br>१. वर्गणीतून खरेदी केलेली<br>२. ई-जर्नल्स<br>३. ई-बुक्स | <br>१०१<br>२१००<br>५१०० | <br>००४<br>६०००<br>३१३५००० | <br>१०५<br>६०००<br>३१३५००० |

**ग्रंथालयातील सभासद संख्या**

| अ.नं. | ग्रंथालयातील सभासद संख्या | विद्यार्थी | शिक्षक | |
|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ विभाग ( अनुदानित आणि विनाअनुदानित) | ३७९५ | ७२ | |
| २ | वरिष्ठ विभाग (विनाअनुदानित) पदव्युत्तर सत्र | ८६६ | | |
| ३ | कनिष्ठ विभाग ( अनुदानित आणि विनाअनुदानित) | १९८९ | ३० | |
| ४ | शिक्षकेत्तर कार्मचारी( अनुदानित आणि विनाअनुदानित) | | ६२ | |
| | **ग्रंथालयातील एकूण सभासद संख्या** | ६६५० | १६४ | |

**माहिती साक्षरतेचा उपक्रम :** कोरोनाच्या संकटामुळे सुरु झालेल्या लॉकडाऊनचा फटका शिक्षण क्षेत्रालाही बसला. या काळात शहरी आणि ग्रामीण भागांतील महाविद्यालय बंद राहिली. मात्र इंटरनेट आणि इतर माध्यमातून ऑनलाईन वर्ग काही ठिकाणी भरले. लॉकडाऊन संपले की महाविधालय पूर्वीप्रमाणे सुरूही होतील. पण खरी अडचण आहे पायाभूत सुविधांची आणि तंत्रज्ञानाची वानवा असणाऱ्या या महाविधालय भागातील विद्यार्थी महाविधालय पासून दुरावला जाऊ नये. या संकटावर मात करण्यासाठी महाविध्यालय स्तरावर माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून महाविद्यालय ग्रंथालयाने टेलीग्राम ग्रुप, वाँटसअँप ग्रुपच्या माध्यमातून मराठी, हिंदी व इंग्रजी पुस्तक विद्यार्थी साठी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. सदर ग्रुपमध्ये १४५६ विद्यार्थी सहभागी झाली आहेत, तंत्रज्ञानाच्या युगात माहिती ही विविध स्वरूपात मुबलकपणे उपलब्ध होत आहे. त्या माहितीच्या प्रवाहातून नेमकी माहिती मिळविणे व ती योग्य प्रकारे वापरणे, यासाठी विशेष कौशल्याची गरज भासत आहे. अशा माहितीच्या बाबतीत चौकस असणे, साक्षर असणे गरजेचे झाले आहे. त्या उद्देशाने महाविद्यालयाचा विद्यार्थी माहिती साक्षर व्हावा यासाठी ग्रंथालयात डॉ. एस. आर. रंगनाथन आणि डॉ . अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी ग्रंथप्रदर्शन भरविण्यात येते परंतु कोरोना चा प्रादुर्भावामुळे काही गोष्टी शक्य झाल्या नाहीत.

**पी.बी.एफ. :-** आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थासाठी ग्रंथपेढी पी. बी. एफ. या योजने अंतर्गत २५८५४५.०० रू. किमतीचे सुमारे १३७२ ग्रंथ खरेदी करण्यात आली.

**नियतकालिके :** विविध विषयावरील ग्रंथसंख्या हे जसे ग्रंथालयातील महत्वाचे अंग आहे. त्याच प्रमाणे नियातकालिके सुद्धा ग्रंथालायाचे महत्वाचे अंग आहे. नियतकालीके हा ताज्या माहितीचा प्रवाह असतो. त्यामध्ये आद्ययावत माहिती मिळते. ही माहिती आमच्या विद्यार्थी व शिक्षकांना मिळावी म्हणून ग्रंथालयात वेगवेगळया विषयावरील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेतील एकूण १०१ नियतकालिके आणि जर्नल्स खरेदी केली जातात. शैक्षणिक वर्षात ६००० ऑनलाईन ई-जर्नल्स आणि ३१३५००० ई-बुक्स चे दरवर्षी नूतनीकरण करून ग्रंथालय सभासदांना उपलब्ध करून देण्यात आली. प्रिंट आणि ई-जर्नल्स आणि ई-बुक्स ई. करिता वर्षभरासाठी वार्षिक वर्गणी स्वरूपात वर्गणी पाठवली जाते.

**दैनिक :** शिक्षक व विद्यार्थी यांना दररोजच्या घडामोडीची माहिती मिळावी या करिता मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेतील २० दैनिक वर्तमान पेपर ग्रंथालय विभागात उपलब्ध करून देण्यात आली. त्यासाठी दरमहा रु. ३००० (तीन हजार रुपये) एवढा खर्च केला जातो.

**कात्रण सेवा** : महाविद्यालयाची प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यासाठी ग्रंथालय विभागातून महाविद्यालयात राबविलेल्या उपक्रमांची माहिती किवां माहितीच्या स्वरूपातील बातमी प्रसिद्ध केली जाते. त्या प्रसिद्ध बातमीचे कात्रण सर्वांसाठी वाचावयास उपलब्ध करून दिली जातात.

**फेसबुक सेवा / वॉट्सअँप** : महाविद्यालात विविध शैक्षणिक उपक्रम आयोजित केली जातात त्या सर्व उपक्रमाची माहिती सोशल नेट्वर्किंगच्या माध्यमातून माहिती महाविद्यालायाच्या फेसबुकवर आणि **वॉट्सअँप** ग्रुप **वर** अपलोड केली जाते. जेणेकरून महाविद्यायालयाची प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

**आंतर ग्रंथालयीन देवघेव सेवा :** महाविद्यालायातील विद्यार्थी व प्राध्यापकांना आपल्या विषयासंबधी पुस्तक ग्रंथालयात उपलब्ध नसेल अशा वेळी खालील ग्रंथालयाचे सभासदत्व घेण्यात आले आहे.

- डेलनेट (डेव्हलोपिंग लायब्ररी नेटवर्क ) चे सभासद, दिल्ली.
- महात्मा गांधी विद्यामंदीर फार्मसी महाविद्यालय, नाशिक
- महात्मा गांधी विद्यामंदीर संचलित, पंचवटी कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड कॉम्पुटर सायन्स नाशिक
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**ग्रंथालयाची सुरक्षितता** : ग्रंथालय विभागातील साहित्य सुरक्षिततेच्या दृष्टीने ग्रंथालय बिभागाचा बासस्ट लाख रुपये चा विमाचे नूतनीकरण करण्यासाठी वार्षिक प्रीमियमपोटी ३००० रू. खर्च करण्यात आली.

**बारकोड तंत्रज्ञान : महाविध्यालय ग्रंथालयाने या वर्षी कोरोनाच्या संकटामुळे सुरु झालेल्या लॉकडाऊनच्या** कालावधीत २३००० हजार पु स्तकांची बारकोड प्रमाणे संगण कांत माहिती अपडेट करण्यात आली. व बारकोड प्रिंट करून पुस्तकांना लावण्यात आले.

**एन. लिस्ट : विद्यापीठ अनुदान आयोगा च्या मनुष्यबळ विकास मंत्रालय भारत सरकार यांच्या संयुक्त** विध्यामाने आयोगाच्या इनफ्लीब्नेट केंद्राच्या माध्यमातून Nlist ह्या प्रकल्पा अतर्गत प्राध्यापक व विध्यार्थी शिक्षक यांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देण्यात आली. या प्रकल्पा त अनेक प्राध्यापक व विध्यार्थी सहभागी आहेत.

**डेलनेट : ह्या प्रकल्पा अतर्गत प्राध्यापक व विध्यार्थी शिक्षक यांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देण्यात** आली. या प्रकल्पात अनेक प्राध्यापक व विध्यार्थी सहभागी आहेत.

**आभार :** महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातील सेवा व सुविधा समृद्ध व अद्ययावत करण्यासाठी संस्थेचे विशवस्त व अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. चंद्रकांत जी. दिघावकर व ग्रंथालय समितीचे सदस्य व माझे सर्व सहकारी आणि विद्यार्थी यांच्या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे व सहकार्याने ग्रंथालयाची प्रगती होत आहे. मनापासून सर्वांचे आभार व्यक्त करतो.

ग्रंथालय विभाग प्रमुख

## ग्रंथालय समिती

| अं. न. | ग्रंथालय समिती सदस्य | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे | अध्यक्ष |
| २. | उपप्राचार्य डॉ. विनित एच. रकिबे | सदस्य |
| ३. | डॉ. संतोष एस. चोबे | सदस्य |
| ४. | प्रा. डॉ. एन. बी. पवार | सदस्य |
| ५. | प्रा. डॉ. एस. डी. पाटील | सदस्य |
| ६. | प्रा. डॉ. के. आर. निकम | सदस्य |
| ७. | प्रा. एस. पी. व्याळीज | सचिव |
| ८. | श्री. एस. एन. शेलार | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | | सदस्य |